| | | |
|---|---|---|
| MHBH030022002022 | दाखल दिनांक | ०६.१०.२०२२ |
| | नोंदणी दिनांक | ०६.१०.२०२२ |
| | निकाल दिनांक | ०७.०४.२०२६ |
| | कालावधी | व. म. दि.<br>०३ ०६ ०१ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१), भंडारा.**

( समक्ष – सो. ल. सोयंके )

**सं.फौ.प्र.क्र.१५११/२०२२** **नि.क्र.१३ खाली**

| | |
|---|---|
| **प्रथम खबरेचा तपशील.** | **अपराध क्रमांक १२१/२०२२ पोलीस ठाणे – वरठी** |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे – पोलीस ठाणे अधिकारी,<br>वरठी, ता. आणि जि. भंडारा. |
| **अभियोग पक्षातर्फे वकील.** | **श्रीमती चोपडे** |
| **आरोपी.** | **जोविंद ब्रिजलाल गजभिये,**<br>वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. पांचगाव, ता. मोहाडी, जि. भंडारा. |
| **आरोपीतर्फे वकील.** | **श्री. आर. डी. कोलते** |

**गुन्हयाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | ०५.०८.२०२२ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | ०५.०८.२०२२ |
| ३. | दोषारोप दाखल तारीख | ०६.१०.२०२२ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | २६.०६.२०२३ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | २६.०७.२०२३ |
| ७. | निकालासाठी राखीव ठेवल्याची तारीख | निरंक |

| | | |
|---|---|---|
| ८. | निकाल तारीख | ०७.०४.२०२६ |
| ९. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | दोषमुक्त. |

**–: न्या य नि र्ण य :–**
**( आज दिनांक ०७.०४.२०२६ रोजी )**

**१.** सरकारी वकीलांचा आणि आरोपीच्या वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. पटलावरील अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन आरोपी विरोधात पुरावा आला असल्यामुळे त्याचा फौ.प्र. सहिंतेचे कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदवला. अभियोग पक्षाच्या साक्षीदाराच्या साक्षीचे व सदर खटल्या कामी दाखल करण्यात आलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करता खालील मुद्दे माझ्या विचारासाठी निघतात, मी त्यांचे निष्कर्ष कारण मिमांसेसहीत खालील प्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | घटनेच्या दिवशी आरोपीने १० लिटर मोहाफुलाची हा.भ. दारु विना परवाना बाळगून महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे सिध्द केले आहे काय? | **...नाही** |
| **२.** | काय आदेश ? | **... अंतिम निकालाप्रमाणे.** |

**कारणमीमांसा**

**मुद्दा क्र.१ करीता –**

**२.** अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द खटला सिध्द करण्यासाठी केवळ एक पंच साक्षीदार शैलेष धनपाल रामटेके (सा.क्र.१) व फिर्यादी सुधाकर राहुल शेंडे (सा.क्र.२) यांची साक्ष नोंदविलेली आहे. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवुन देखील तपासी अंमलदार व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नसल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे.

**३.** पटलावरील पुराव्याचे अवलोकन केले असता तपासलेल्या पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. सरकारी वकीलांनी घेतलेल्या त्याच्या उलट तपासामध्ये देखील अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही बाब पटलावरती आलेली नाही. फिर्यादी सुधाकर अ.सा.क्र.२ याने जरी त्यांच्या पुराव्यात आरोपीच्या ताब्यातून झडतीमध्ये १० लिटर मोहाफुलाची हा.भ. दारु मिळून आल्याबाबत व त्याबाबतचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा नि.क्र.२० व २२ तयार केल्याबाबत व आरोपीविरुद्ध फिर्याद व पहिली छापील खबर नि.क्र.२४

व २५ दिल्याबाबत त्याच्या सरतपासात सांगीतले असले तरी देखील त्यांच्या साक्षीस दुजोरा देण्यासाठी इतर प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे केवळ फिर्यादीच्या पुराव्यावर अवलंबून राहून आरोपीने दोषारोपीत गुन्हा केला असे म्हणता येणार नाही. तसेच अभियोग पक्षास पुरेशी संधी देवुन देखील तपासी अंमलदार व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नसल्यामुळे आरोपी विरोधात पटलावरती इतर कोणताही पुरावा आलेला नाही.

**४.** अभियोग पक्षाचा पटलावरील पुरावा घटनेच्या दिवशी आरोपीने १० लिटर मोहाफुलाची हा.भ. दारु बाळगल्याचे सिध्द करण्यास अपुरा आहे. त्यामुळे जरी पटलावरती रासायनिक तपासणीचा अहवाल दाखल केलेला असला तरी जप्ती आणि घटनास्थळ पंचनामा निसंशयपणे सिध्द झालेला नसल्यामुळे घटनेच्या दिवशी आरोपीच्या ताब्यातुन मोहादारु जप्त केल्याची बाब संशया पलीकडे सिध्द होत नाही. सबब आरोपी हा निर्माण होत असलेल्या संशयाचा फायदा मिळण्यास पात्र असल्यामुळे मी मूद्दा क्र.१ साठीचा निष्कर्ष नाही असा नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

**५.** मुद्दा क्र.१ चा नाही हा निष्कर्ष विचारात घेता आरोपीस संशयाचा फायदा देऊन दोषमुक्त करणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ साठी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>अंतिम आदेश</u>

१) आरोपी जोविंद ब्रिजलाल गजभिये याची महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येवुन त्याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे योग्य तो जामीन द्यावा.

३) जप्ती पत्रकातील नमुद मुल्यहीन मुद्देमाल शिल्लक असल्यास अपील कालावधी नंतर नियमाप्रमाणे नष्ट करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )**

Digitally signed by SOYANKE SONALI LAXMAN
Date: 2026.04.07 13:48:34 +0530

( सो. ल. सोयंके )

दिनांक – ०७.०४.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१.,

ठिकाण – भंडारा. भंडारा.

## साक्षीदारांचा आणि पुराव्याचा तपशील

### १.अभियोग पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | शैलेष धनपाल रामटेके | घटनास्थळ व जप्ती पंच |
| अ.सा.क्र.२ | सुधाकर राहुल शेंडे | फिर्यादी |

### २.अभियोग पक्षातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | नि.क्र.पी.१९ व २३ | सुचनापत्र |
| २. | नि.क्र.पी.२० | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | नि.क्र.पी.२१ व २२ | मोकळया बाटलीचा व जप्ती पंचनामा |
| ४ | नि.क्र.पी.२४ व २५ | फिर्याद व छापील खबर |
| ५ | नि.क्र.पी.२६ | पत्र |

### ३.आरोपी पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

### ४.आरोपीतर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

### ५.न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**६.न्यायालयातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**७.महत्वाच्या वस्तु/(मटेरिअल ऑब्जेक्ट).**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

Digitally signed by
SOYANKE
SONALI LAXMAN
Date: 2026.04.07
13:48:40 +0530

(सो. ल. सोयंके )

दिनांक – ०७.०४.२०२६
ठिकाण – भंडारा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१.,
भंडारा.

# CERTIFICATE

" I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Judicial Magistrate F. C. (Court No.1) Bhandara. |
| Name of the Stenographer | : | A. A. Lokhande, (Steno L. G.). |
| Date of dictation | : | 07.04.2026 |
| Judgment signed by presiding officer on | : | 07.04.2026 |
| Judgment uploaded on | : | 07.04.2026 |